## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

केंद्र शासनाने फेरीवाल्यांसाठी पारित केलेल्या "पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विनियमन अधिनियम, २०१४ (२०१४ चा ७) कलम ३६ (१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने **महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्रि विनियमन) (महाराष्ट्र) नियम,२०१६"** तयार झाले. असून दि ०३/०८/२०१६ च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध केले आहेत. सदर अधिनियमाच्या नियम ११ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथविक्रेता समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार पथविक्रेत्यांचे प्रतिनिधी व्यतिरिक्त अन्य सदस्यांची नगर पथविक्रेता समिती गठित करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. या अधिनियमातील नियम ११ (२) (ख) (दोन) ते (सहा) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संवर्गातील संघटनाचे प्रतिनिधीत्व करणा-या व्यक्तिची नगर पथविक्रेता समितीवर सदस्य म्हणून नेमणूक नियम १२ मध्ये विहित केलेल्या अर्हता प्राप्त खालिल प्रमाणे नमुद संघटनांचे प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | इतर मंडळे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| ख. | (दोन) अशासकिय संघटना आणि समुदाय आधारित संघटना (NGO & CBO) | ०२ |
| | (तीन) निवासी कल्याण संघ (Residency Welfair Assiociations ) | ०२ |
| | (चार) व्यापारी संघाचा प्रतिनिधी (Representitude Welfare Association) | ०१ |
| | (पाच) पणन संघाचा प्रतिनिधी (Representative of Market Association) | ०१ |

अटि/शर्तीः (१) संघटनेच्या किंवा संघाची नोंदणी,क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाने केलेली असावी.

(२) संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरिक्षण अहवाल सादर करील.

(३) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे.

(४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.

(५) संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्यावर त्यांच्या संवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा..

वरिल प्रमाणे अटी/शर्तीची पुर्तता करणा-या संघटनेचे प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तींनी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर, यांचे नावे प्रशासकिय भवन येथील नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, येथे ही जाहीरात प्रसिदध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत आवश्यक कागदपत्रासह लेखी अर्ज सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या व अपूर्ण कागदपत्रासह सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

उमपा/५१५/मा वि./२०१६-२०१७.
दि. ०८/ ८ /२०१७

सही/-
आयुक्त तथा अध्यक्ष
नगर पथ विक्रेता समिती
उल्हासनगर महानगरपालिका